Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

शरद पवार यांच्या दौऱ्याच्या नियोजनासाठी बैठक

(पान २ वर)



। बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक १३८ ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

## Selected

### कच्च्या तेलावरील भारताचे विदेशी अवलंबित्व कमी होणार

हिंगोली : तेल उत्खननासाठी सरकार आपल्या ८.८ अब्ज डॉलर्सच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा वर्षनिहाय आराखडा तयार करत आहे. त्याअंतर्गत ड्रिलिंग, भूकंपीय सर्वेक्षणापासून ते प्रत्यक्ष तेल विहीर खोदण्यासाठीचे 'रिग' तैनात करण्याबाबत वर्षनिहाय अंमलबजावणी आराखडा तयार केला जात आहे.पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या (पीएसयू) प्रमुखांची भेट घेतली. गुरुग्राम (हरियाणा) आणि दुलियाजान (आसाम) येथे अलीकडेच झालेल्या विचारमंथन सत्रांमधील निर्णयांवर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक घेण्यात आली होती. पेट्रोलियम मंत्रालय खोल आणि अति-खोल समुद्रातील भागात तेल आणि वायूचे उत्पादन वाढवण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

## रक्षाबंधन जाहिरातीतील पेहरावावरून रंगलेल्या वादात कंगनाला राहुल गांधींचे प्रत्युत्तर

# 'कपड्यांवरून संस्कृती ठरवणं बंद करा!

### अभिनेत्री कृती सेनॉनसाठी राहुल गांधी मैदानात

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली ।रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या एका दागिन्यांच्या जाहिरातीतील कपड्यांवरून अभिनेत्री कृती सेनॉनवर समाजमाध्यमांतून टीका होत असतानाच, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तिच्या बाजूने ठाम भूमिका घेतली आहे.**

"स्त्रीने काय परिधान करावे ही संपूर्णपणे तिची स्वतःची निवड आहे," अशा शब्दांत राहुल गांधी यांनी कृतीचे समर्थन केले आहे. आपल्या इन्स्टाग्राम पोस्टद्वारे भूमिका स्पष्ट करताना राहुल गांधी यांनी नमूद केले की, "स्त्रीने कोणते कपडे परिसावेत, काय करावे आणि कुठे जावे, हा सर्वस्वी तिचा वैयक्तिक अधिकार आहे. स्त्रिया जेव्हा आपल्या स्वातंत्र्याचा वापर करतात, तेव्हा त्यांना समाजमाध्यमांवर लक्ष्य करणे आणि ट्रोल करणे थांबवा."रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने कृती सेनॉनचा सहभाग असलेली दागिन्यांची एक जाहिरात प्रसारित करण्यात



आली आहे. या जाहिरातीमध्ये राखी बांधताना कृतीने इंडो-वेस्टर्न धाटणीचा पोशाख परिधान केला होता. या पेहरावावरून अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना राणावत यांच्यासह काही समाजमाध्यम वापरकर्त्यांनी तीव्र आक्षेप घेत कृतीवर संस्कृतीचा अनादर केल्याचा आरोप केला होता.या वादावर स्वतः कृती सेनॉननेही समाजमाध्यमांवरून टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले होते. "सणांचे मूळ हे कपड्यांमध्ये नसून त्या परंपरेमागील भावना आणि अर्थामध्ये सामावलेले असते. रक्षाबंधन हे संरक्षणाचे पवित्र बंधन आहे. मी आणि माझी बहीण परस्परांना राखी बांधतो; कारण भावाप्रमाणेच आम्हीही एकमेकींचे रक्षण करण्यास पूर्णपणे सक्षम आहोत," असे तिने स्पष्ट केले. महिलांच्या पेहरावावर होणाऱ्या सततच्या नैतिक मूल्यमापनावर प्रश्न उपस्थित करत ती पुढे म्हणाली, "महिलांनी काय परिधान करावे हे सांगणे समाज कधी थांबवणार आहे? काळाच्या ओघात पारंपरिक फॅशनमध्ये अनेक बदल झाले आहेत; तरीही आजही एखाद्या महिलेचा संस्कृतीबद्दलचा आदर हा केवळ तिच्या कपड्यांवरून मोजला जातो, हे दुर्दैवी आहे. संस्कृती आणि परंपरा ही व्यक्तीच्या मनात व हृदयात असते, तिच्या कपड्यांच्या गळ्याच्या मापात (नेकलाइन) नव्हे."तत्पूर्वी, भाजप खासदार कंगना राणावत यांनी इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे या जाहिरातीतील पेहरावावर अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त करत कृतीवर टीका केली होती. आजची महिला ही जागतिक पातळीवर वावरणारी असली तरी सणांच्या पारंपरिक जाहिरातींमध्ये विशिष्ट शैलीतील पेहरावाच्या निवडीवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. मात्र, आता या वादात थेट राहुल गांधी यांनी उडी घेत महिलांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा पुरस्कार केल्यामुळे हा मुद्दा राजकीय व सामाजिक वर्तुळात चांगलाच चर्चेत आला आहे.

### "महिलांनी काय परिधान करावे

सणांचे मूळ हे कपड्यांमध्ये नसून त्या परंपरेमागील भावना आणि अर्थामध्ये सामावलेले असते. रक्षाबंधन हे संरक्षणाचे पवित्र बंधन आहे. मी आणि माझी बहीण परस्परांना राखी बांधतो; कारण भावाप्रमाणेच आम्हीही एकमेकींचे रक्षण करण्यास पूर्णपणे सक्षम आहोत," असे तिने स्पष्ट केले.महिलांच्या पेहरावावर होणाऱ्या सततच्या नैतिक मूल्यमापनावर प्रश्न उपस्थित करत ती पुढे म्हणाली, "महिलांनी काय परिधान करावे हे सांगणे समाज कधी थांबवणार आहे? तरीही आजही एखाद्या महिलेचा संस्कृतीबद्दलचा आदर हा केवळ तिच्या कपड्यांवरून मोजला जातो, हे दुर्दैवी आहे

## FDA औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर रॅकेट; 40-40 लाखांना विकला

### MPSC नं परीक्षा रद्द करताच रोहित पवारांचा दावा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक,गट-ब या संवर्गासाठी घेण्यात आलेली भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार (Rohit Pawar) यांनी या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. एमपीएससीनं पेपर रद्द करताना फुटलेला पेपर केवळ एका विद्यार्थ्याकडे असल्याचं दिलेलं स्पष्टीकरण मान्य करण्यासारखं नाही. एजंटांच्या रॅकेटमार्फत पेपर 40-40 लाखांना विकला गेला ही वस्तुस्थिती असून हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मान्य असल्याचं देखील रोहित पवार यांनी म्हटलं आहे. रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट करत आयोगाच्या परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. पेपरलीक झालेली औषध निरीक्षक पदाची परीक्षा अखेर MPSC ने आज रद्द केली. पेपरलीक झाल्याचा मुद्दा आम्ही पुरव्यासकट समोर आणला, तपास यंत्रणांकडे आवश्यक तो सर्व पाठपुरावा केला, अखेर आज तपासात पेपरलीक झाल्याचे निष्पन्न झाले आहे, असं रोहित पवार म्हणाले. आयोगाने पेपर रद्द केला असला तरी एका विद्यार्थ्याकडेच पेपर असल्याचे आयोगाचे स्पष्टीकरण कदापि मान्य करण्यासारखे नाही.

आमच्याकडे आलेल्या माहितीनुसार राज्यभरात कार्यरत असलेल्या एजंटच्या रॅकेटमार्फत 40 -40 लाखाला पेपर विकला गेला ही वस्तुस्थिती आहे आणि आयोगाला



देखील ही वस्तुस्थिती माहीत आहे, असं रोहित पवार यांनी म्हटलं. आयोगाने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न न करता चौकशी अहवाल सार्वजनिक करावा तसेच आम्ही ज्या एजंट लोकांची नावे दिली होती त्यांचे काय झाले? आयोगातून कोणी सहभागी आहे का? कोणाचा वरदहस्त आहे? हे देखील सांगावे. आयोगाने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला तर आम्ही मात्र गप्प बसणार नाही, असा इशारा रोहित पवार यांनी दिला. आयोगाचा पेपर लीक होणे ही साधारण घटना नसून अत्यंत गंभीर बाब असून आयोगाच्या विश्वासार्हतेचा हा प्रश्न आहे. त्यामुळे आयोगाच्या अध्यक्षांनी नैतिक जबाबदारी घेत तत्काळ राजीनामा द्यावा. सरकारने देखील स्वच्छ प्रतिमेच्या व्यक्तीची आयोगाच्या अध्यक्षपदी नेमणूक करावी. सामान्य प्रशासन विभागाच्या मंत्र्यांनी देखील यावर सरकारतर्फे भूमिका मांडून राज्यातील जनतेला वस्तुस्थिती सांगावी, असंही रोहित पवार यांनी म्हटलं. दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब या संवर्गासाठी घेण्यात आलेली भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. आता लोकसेवा आयोगाकडून फेरपरीक्षेचं आयोजन केलं जाणार आहे.

## आयात साखर विक्रीसाठी दोन महिन्यांची मुदत!

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** केंद्र सरकारने शुल्कमुक्त कच्च्या साखरेच्या आयात आणि विक्रीसाठीच्या अटींमध्ये सुधारणा केली. नव्या नियमानुसार आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून ती देशांतर्गत बाजारात विकण्यासाठी असलेली ३१ ऑक्टोबरची अंतिम मुदत रद्द करण्यात आली असून आता कच्ची साखर दोन महिन्यांच्या आत पांढऱ्या किंवा शुद्ध साखरेमध्ये रूपांतरित करून देशांतर्गत बाजारात विकता येईल. या निर्णयामुळे साखर उद्योगाला दिलासा मिळाला आहे. आयातीसाठीची ३१ ऑक्टोबरची अंतिम तारीख मात्र कायम ठेवण्यात आली आहे. सरकारने जारी केलेल्या एका अधिकृत अधिसूचनेत, विदेशी व्यापार महासंचालनालयाने २० ऑगस्टच्या पूर्वीच्या आदेशात बदल केला. जुन्या आदेशानुसार, 'टॅरिफ रेट कोटा'अंतर्गत आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून ती ३१ ऑक्टोबरपर्यंत देशांतर्गत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करणे आवश्यक होते.साखर उद्योगाने ३१ ऑक्टोबरच्या पूर्वीच्या मुदतीबाबत चिंता व्यक्त केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. साखरेच्या आयातीसाठीचा एक प्रमुख स्रोत असलेल्या ब्राझीलमधून माल भारतात पोहोचण्यासाठी साधारणपणे ४०-४५ दिवस लागतात. बंदरावरील हाताळणी, रिफायनरीपर्यंतची वाहतूक आणि इतर आयात प्रक्रिया यामध्ये आणखी वेळ जातो, ज्यामुळे कच्च्या



साखरेवर प्रक्रिया सुरू होण्यास विलंब होतो. माल पोहोचल्यानंतर कच्च्या साखरेचे पांढऱ्या किंवा शुद्ध साखरेत रूपांतर करून ती देशांतर्गत बाजारात आणण्यासाठीही कारखान्यांना वेळ लागतो. 'अॅडव्हान्स ऑथोरायझेशन स्कीम'अंतर्गत साखर रिफायनर्स आयात शुल्क न भरता कच्च्या साखरेची आयात करू शकतात. त्या बदल्यात त्यांना भारतात साखरेवर प्रक्रिया करून तयार उत्पादन निर्यात करणे आवश्यक असते.ऑगस्ट महिन्यात दिलेल्या कोट्यानुसार साखर विक्रीस सहा दिवसांचा कालावधी शिल्लक राहिल्यामुळे आणि ग्राहकांकडून खरेदी कमी होत आहे. त्यामुळे निविदांमध्ये साखरेचे दर क्विंटलला ५०० रुपयांनी गडगडले असून एस ३० ग्रेडचा दर घटून ५४०० ते ५५०० रुपयांपर्यंत खाली आला. केंद्र सरकारकडून साखर दरवाढीला आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विविध उपाययोजनांमध्ये सट्टेबाजांवर लक्ष केंद्रित झाले असून कारखान्यांकडील विक्रीनुसार उपलब्ध साखर साठ्याचे सुरू असलेल्या माहिती संकलनामुळे संभाव्य कारवाईच्या शक्यतेने दबाव निर्माण झाल्यामुळे दरात मोठ्या प्रमाणात घसरण सुरू झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

## खासगी कंपन्याही बनवणार क्षेपणास्त्रे

नवी दिल्ली : देशाच्या सुरक्षेत आता खासगी कंपन्याही मोठी भूमिका बजावणार आहेत. आता संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) विकसित केलेली क्षेपणास्त्रे केवळ सरकारी कंपनीच नाही, तर भारतातील खासगी कंपन्याही तयार करू शकतील, असा निर्णय सरकारने घेतला आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मंगळवारी या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.या उपक्रमाचा मुख्य उद्देश संरक्षण साहित्याच्या आयातीवरील अवलंबित्व कमी भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राचा विस्तार होण्यास व स्वदेशी संरक्षण क्षमता बळकट होण्यास मदत होईल.

## अन्न व औषध प्रशासन- औषध निरीक्षक, गट ब,भरती प्रक्रिया रद्द

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** अन्न व औषध प्रशासनाच्या परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप आणि पुरावे समोर आल्यानंतर संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (MPSC) निर्णय घेतला आहे. गुन्हे अन्वेषण शाखेच्या अहवालानुसार परीक्षेत गैरप्रकार झाल्याचं निष्पन्न झाल्यानं आणि एकाच उमेदवाराला या परीक्षेचा प्रश्न संच मिळाला आणि त्याचा लाभ घेतल्याचं उघड झालं आहे. एमपीएससीनं हा निर्णय घेतल्यानं या मुद्यावरुन लढणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठं यश मिळालं आहे. या प्रकरणात पहिल्यांदा आमदार रोहित पवारांनी



पेपरफुटीचा आरोप केला होता. एमपीएससी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आज राज ठाकरे यांची भेट घेतली होती. तर, पुण्यात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी घेतलेल्या छात्रों की गुंज कार्यक्रमात एका विद्यार्थिनीने हा मुद्दा मांडला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अन्न व औषध प्रशासन- औषध निरीक्षक, गट ब भरती प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने फेरपरीक्षा आयोजित करणार आहे. यासंदर्भातील प्रसिद्धीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. आयोगामार्फत औषध निरीक्षक, गट-ब, अन्न व औषध प्रशासन या संवर्गासाठी २९ जुलै, २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. २२ मार्च २०२६ रोजीच्या चाळणी परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत आयोगास दिनांक २२ ते २६ जुलै, २०२६ या कालावधीत ईमेलद्वारे काही उमेदवारांमार्फत तसेच लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या. दिनांक २० मार्च, २०२६ रोजी काही उमेदवारांना प्रश्नपत्रिका/प्रश्न मिळाले होते आणि ही प्रश्नपत्रिका सोशल मीडिया/इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसृत करण्यात आली होती असे सदर तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले होते. आयोगामार्फत तातडीने उपरोक्त प्राप्त तक्रारीतील आशयाचे गांभीर्य आणि प्रकरणाची संवेदनशिलता विचारात घेऊन, प्राप्त सर्व तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे २७ जुलै, २०२६ रोजी तक्रार दाखल करण्यात आली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## जुलै महिन्यात झालेल्या पावसानंतर मराठवाड्यात भीषण पाणीसंकट!

### तहानलेल्या गावांसह टँकरच्या संख्येत वाढ, ४७७ विहिरी अधिग्रहित

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी:** ऑगस्ट महिन्याचा शेवटचा आठवडा सुरू झाला तरी मराठवाड्यात दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पावसाने मोठा खंड दिल्याने पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. सात दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरसह अन्य तीन जिल्ह्यांतील मिळून एकूण ५१ गावे आणि ४८ वाड्यांना ११४ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात होता. तर आता तहानलेल्या गावांच्या संख्येसह टँकरच्या संख्येतही वाढ झाली आहे. आजघडीला चार जिल्ह्यांतील तहानलेली १०५ गावे आणि ५५ वाड्यांना १८१ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. याशिवाय



मराठवाड्यात ४७७ विहिरीही अधिग्रहित करण्यात आल्याची माहिती विभागीय आयुक्तालया प्रशासनातर्फे देण्यात आली. तर उर्वरित चारही जिल्हे टँकरमुक्त आहेत. उन्हाळा सुरू होताच यंदाही मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील तहानलेल्या गावात टप्प्याटप्याने टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू झाला. पावसाळा सुरू झाल्यावर टँकरचा प्रश्न निकाली लागेल, पाऊस झाला नाही आणि जलस्रोत आटलेल्या गावांची तहान भागविण्यासाठी ग्रामस्थांना जूननंतर देखील टँकरचा आधार घ्यावा लागला. 'अंतर्वस्त्र घालून कोण भावाला राखी बांधतं', क्रितीच्या रक्षाबंधन स्पेशल जाहिरातीतील लुकवर कंगना रणौतची जोरदार टीका 'कपूर' घराण्यातील अभिनेता, अपयशाचं खापर वडिलांवर फोडलं, लग्नाच्या 2 वर्षात काडीमोड अन् दारूच्या आहारी; वयाच्या 58व्या वर्षी मृत्यू 'तो चुकीच्या पद्धतीनं स्पर्श करायचा', बालपणी सेक्रेटरीकडून शारीरिक शोषण, मास्टर रवी यांचा खुलासा 'शास्त्र असतं ते...' फेम रेणुका दफ्तरदार पुन्हा झळकणार मोठ्या पडद्यावर, हास्यजत्रा फेम अभिनेताही सोबतीला, प्रेक्षक उत्सु जून, जुलै महिन्यात यात वाढ झाल्याने एकही जिल्हा टँकरमुक्त नव्हता. विशेष म्हणजे जून अखेर छत्रपती संभाजीनगरातील टँकर बंद करण्यात आले होते. परंतु ग्रामस्थांनी मागणी केल्याने टँकर पुन्हा सुरू करावे लागले. १४ जुलैदरम्यान विभागातील तहानलेल्या गावांना ३०३ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात होता. तर जुलैच्या शेवटच्या आठवड्यात परभणी वगळता विभागातील उर्वरित सात जिल्ह्यांतील एकूण २५७ गावे आणि १३० वाड्यांना ४२८ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू होता.

### ४७७ विहिरींचे अधिग्रहण

संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन परभणी, हिंगोली, नांदेड हे तीन जिल्हे वगळून मराठवाड्यातील उर्वरित पाच जिल्ह्यांतील खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. २४ ऑगस्टच्या अहवालानुसार, एकूण ४७७ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३१, जालना ३०, बीड १५, लातूर २१७, तर धाराशिव जिल्ह्यातील १८३ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
- तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
- समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
- तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत
- पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत
अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ

संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# 69 वर्षीय राम यादव अडसुळ यांनी रचला इतिहास!

## शीर्षासनातून विश्वविक्रमाची नोंद सुमारे ३ फूट उंच टेबलवर ८.२२ सेकंद शीर्षासन

जन सम्राट टाईम्स

**देहूरोड (पुणे) | प्रतिनिधी:** वय हे केवळ एक आकडा असल्याचे सिद्ध करत ६९ वर्षीय श्री. राम यादव अडसुळ यांनी अनोखी कामगिरी करत विक्रमाची नोंद केली आहे. देहूरोड येथे आयोजित विशेष विक्रम प्रयत्नादरम्यान त्यांनी सुमारे तीन फूट उंच टेबलवर ८.२२ सेकंद शीर्षासन (Headstand) करून विक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या या कामगिरीची नोंद इंटरनॅशनल एक्सलन्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स (IEA Book of World Records) मध्ये करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. हा विक्रम प्रयत्न IEA Book of World Recordsच्या ज्युरी पॅनलच्या देखरेखीखाली पार पडला. निर्धारित मार्गदर्शक तत्त्वे आणि पडताळणी प्रक्रियेनुसार ज्युरी सदस्यांनी कामगिरीची अधिकृत नोंद व सत्यापन केले. जिद्द आणि चिकाटीचे कौतुक यावेळी डॉ. संदीप सिंह (मुख्य कार्यकारी अधिकारी – IEA Book of World Records) तसेच योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरीजी महाराज (राष्ट्रीय ज्युरी, महाराष्ट्र) प्रमुख उपस्थित होते. त्यांनी राम यादव अडसुळ यांच्या जिद्द, चिकाटी आणि समर्पणाचे कौतुक करत ही कामगिरी समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार म्हणून अमर राम अडसुळ, लहू राम अडसुळ, डॉ. राजेंद्र ताकले, दीपक मित्तल, सुशीलकुमार गोयल, आकाश गायकवाड आणि मानव लोहेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास माध्यम प्रतिनिधी म्हणून सागर खोट, शुभम खोट, नवशाद अन्सारी आणि नेहा सोनवणे यांनी उपस्थिती लावली. ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव



विक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर श्री. राम यादव अडसुळ यांना ट्रॉफी, मेडल, बॅज, प्रमाणपत्र आणि रेकॉर्ड किट प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कामगिरीचे कौतुक करत, “जिद्द, आत्मविश्वास आणि सातत्य असेल तर कोणत्याही वयात नवा इतिहास घडवता येतो,” असे मत व्यक्त केले. विविध स्तरांतून अभिनंदन राम यादव अडसुळ यांच्या या अभिमानास्पद कामगिरीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. वय हे केवळ एक आकडा असल्याचे सिद्ध करत ६९ वर्षीय श्री. राम यादव अडसुळ यांनी अनोखी कामगिरी करत विक्रमाची नोंद केली आहे.

देहूरोड येथे आयोजित विशेष विक्रम प्रयत्नादरम्यान त्यांनी सुमारे तीन फूट उंच टेबलवर ८.२२ सेकंद शीर्षासन (Headstand) करून विक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या या कामगिरीची नोंद इंटरनॅशनल एक्सलन्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स (IEA Book of World Records) मध्ये करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. हा विक्रम प्रयत्न IEA Book of World Recordsच्या ज्युरी पॅनलच्या देखरेखीखाली पार पडला. निर्धारित मार्गदर्शक तत्त्वे आणि पडताळणी प्रक्रियेनुसार ज्युरी सदस्यांनी कामगिरीची अधिकृत नोंद व सत्यापन केले.

जिद्द आणि चिकाटीचे कौतुक यावेळी डॉ. संदीप सिंह तसेच योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरीजी महाराज त्यांनी राम यादव अडसुळ यांच्या जिद्द, चिकाटी आणि समर्पणाचे कौतुक करत ही कामगिरी समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार म्हणून अमर राम अडसुळ, लहू राम अडसुळ, डॉ. राजेंद्र ताकले, दीपक मित्तल, सुशीलकुमार गोयल, आकाश गायकवाड आणि मानव लोहेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास माध्यम प्रतिनिधी म्हणून सागर खोट, शुभम खोट, नवशाद अन्सारी आणि नेहा सोनवणे यांनी उपस्थिती लावली. ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव विक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर श्री. राम यादव अडसुळ यांना ट्रॉफी, मेडल, बॅज, प्रमाणपत्र आणि रेकॉर्ड किट प्रदान करून गौरविण्यात आले.

# ४४ हजार ७१३ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा!

जन सम्राट टाईम्स

**परभणी | प्रतिनिधी :** परभणी, दि. २५ : ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६’ अंतर्गत परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शासनाने जाहीर केलेल्या दुसऱ्या यादीत जिल्ह्यातील ४४ हजार ७१३ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ३४८.०२ कोटी रुपयांची रक्कम त्यांच्या कर्जखात्यांमध्ये जमा केली आहे.

त्यामुळे कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या हजारो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. या योजनेअंतर्गत थकबाकीदार पात्र शेतकऱ्यांची यादी २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. परभणी जिल्ह्यातील एकूण १ लाख ६० हजार ७६९ शेतकरी सभासदांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणीचे २ हजार ९८५, तर राष्ट्रीयीकृत बँकांमधील १ लाख ५७ हजार ७८४ शेतकरी सभासदांचा समावेश आहे. प्राप्त यादीतील ७९ हजार ८५५ शेतकऱ्यांना सुमारे ५८२ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. दोन टप्प्यांत ५२ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ शासनाने ७ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर केलेल्या पहिल्या यादीत परभणी जिल्ह्यातील ७ हजार ८७० शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ६० कोटी ४ लाख १० हजार ९६६ रुपये त्यांच्या कर्जखात्यांमध्ये जमा केले. ७१३ शेतकऱ्यांसाठी ३४८.०२ कोटी रुपये जमा करण्यात आले. त्यामुळे आतापर्यंत दोन टप्प्यांत एकूण ५२ हजार ५८३ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ४०८.०६ कोटी रुपयांची रक्कम जमा झाली आहे. यापैकी परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील ११० शेतकरी सभासदांना ४.७१ कोटी रुपयांचा लाभ मिळाला आहे. ५८ हजार १३४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण योजनेचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरण महत्त्वाचे असून आतापर्यंत ५८ हजार १३४ शेतकरी सभासदांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

# ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर वाघोदा बु. येथे सावदा पोलिसांचा फ्लॅग मार्च

## पोलिसांचा कडक बंदोबस्त



जन सम्राट टाईम्स

**वाघोदा बु. | प्रतिनिधी :** ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच कोणतीही अनुचित घटना अथवा तणावाची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी सावदा पोलिसांच्या वतीने वाघोदा बु. येथे फ्लॅग मार्च व बंदोबस्त संचलन करण्यात आले.

२६ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून गावातील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी गावातील संवेदनशील भाग, प्रमुख रस्ते, गल्लीबोळ तसेच गर्दी होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली. संवेदनशील भागांची पोलिसांकडून पाहणी फ्लॅग मार्चदरम्यान पोलिस पथकाने गावातील विविध भागांतून संचलन करत परिस्थितीची माहिती घेतली. सणाच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने पोलिसांकडून पाहणी करण्यात आली. शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन ईद-ए-मिलादचा सण शांततेत आणि उत्साहात पार पडावा, यासाठी नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संशयास्पद प्रकार आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असेही सांगण्यात आले.

सावदा पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी गणेश फड यांच्या मार्गदर्शनाखाली हा फ्लॅग मार्च व बंदोबस्त संचलन करण्यात आले. सणाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून, गावात शांतता, सलोखा आणि कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज असल्याचे यावेळी दिसून आले. ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच कोणतीही अनुचित घटना अथवा तणावाची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी सावदा पोलिसांच्या वतीने वाघोदा बु. येथे फ्लॅग मार्च व बंदोबस्त संचलन करण्यात आले. २६ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून गावातील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.

# एचआयव्ही-एड्स जनजागृती कार्यशाळा उत्साहात

## गैरसमज आणि भेदभावाबाबत ग्रामस्थांचे सवेदीकर

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव I प्रतिनिधी:** राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई आणि जिल्हा एड्स नियंत्रण कार्यक्रम, जळगाव यांच्या अंतर्गत ‘इंटेन्सिफाइड कॅम्पेनिंग’ उपक्रम १२ ऑगस्ट ते १२ ऑक्टोबर या कालावधीत शाळा, महाविद्यालये आणि ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत २५ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रामपंचायत सोनवद बुद्रूक, ता. धरणगाव, जि. जळगाव येथे एचआयव्ही-एड्स जनजागृती व सवेदीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत एचआयव्ही संसर्गाचे मार्ग व प्रतिबंधात्मक उपाय, एचआयव्ही-एड्सबाबत असलेले समज-गैरसमज, कलंक व भेदभाव तसेच एचआयव्ही आणि एड्स प्रतिबंधक (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, २०१७ याबाबत ग्रामस्थांना सविस्तर माहिती देण्यात आली. एचआयव्हीबाबत गैरसमज दूर करण्यावर भर कार्यशाळेदरम्यान एचआयव्ही संसर्ग कशामुळे होतो आणि कोणत्या मार्गांनी होत नाही, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. एचआयव्ही बाधित व्यक्तींशी भेदभाव न करता त्यांना



सामाजिक आधार देणे आवश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच एचआयव्ही-एड्सशी संबंधित विविध गैरसमज दूर करून वैज्ञानिक आणि वस्तुनिष्ठ माहिती समाजापर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा महत्त्वाचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. शासकीय आरोग्य सुविधांची माहिती कार्यशाळेत विविध आजारांचे प्रतिबंध व निर्मूलन, उपलब्ध शासकीय आरोग्य सुविधा तसेच आरोग्यविषयक टोल फ्री क्रमांक याबाबतही उपस्थितांना माहिती देण्यात आली. आरोग्यविषयक समस्या उद्भवल्यास योग्य वेळी शासकीय आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. ‘इंटेन्सिफाइड कॅम्पेनिंग’चा उद्देश आणि महत्त्व स्पष्ट करताना लोकसहभाग आणि प्रत्येक नागरिकाची जबाबदारी यावरही विशेष भर देण्यात आला. ग्रामपंचायत पदाधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांची उपस्थिती कार्यशाळेला ग्रामपंचायत सरपंच सौ. उज्वला धीरज पाटील, उपसरपंच नारायण देवरे, ग्रामपंचायत सदस्य सौ. आशाताई पाटील, गुलाब पाटील, सौ. वंदना पाटील, सौ. शितल पाटील, भाऊसाहेब सचिन पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# मलकापूर तालुक्यात चोरट्यांचा धुमाकूळ; माकनेरमध्ये मध्यरात्री महिलेवर चाकूहल्ला

## चोरीचा प्रयत्न फसल्याने चोरट्यांकडून महिलेवर हल्ला

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर । प्रतिनिधी :** मलकापूर तालुक्यातील ग्रामीण भागात चोरट्यांच्या हालचाली वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्राम काटी येथील हल्ल्याची घटना ताजी असतानाच आता माकनेर गावात मध्यरात्री २ ते ३ वाजेच्या सुमारास ४ ते ५ चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. चोरीचा प्रयत्न उधळून लावण्यात आल्यानंतर संतप्त चोरट्यांनी एका महिलेवर धारदार चाकूने हल्ला करून घटनास्थळावरून पलायन केल्याची माहिती आहे. या हल्ल्यात महिला जखमी झाली असून, घटनेनंतर माकनेरसह परिसरातील गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मध्यरात्री घडलेल्या या घटनेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. चोरीचा प्रयत्न फसला; संतप्त चोरट्यांचा महिलेवर हल्ला मिळालेल्या माहितीनुसार, माकनेर



गावात मध्यरात्री २ ते ३ वाजेच्या दरम्यान ४ ते ५ संशयित चोरटे चोरीच्या उद्देशाने आले होते. चोरीचा प्रयत्न सुरू असताना त्यांचा डाव उधळून लावण्यात आला. यामुळे संतप्त झालेल्या चोरट्यांनी गावातील एका महिलेवर धारदार चाकूने हल्ला केला आणि त्यानंतर घटनास्थळावरून पसार झाले. हल्ल्यात महिला जखमी झाल्याने तिला उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. काटीतील घटनेनंतर पुन्हा शस्त्राचा वापर काही दिवसांपूर्वीच मलकापूर तालुक्यातील काटी येथे एका ग्रामस्थावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला होता. या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच माकनेर येथे चोरट्यांनी पुन्हा धारदार शस्त्राचा वापर केल्याने ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तालुक्यातील विविध ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचाली आणि चोरीच्या घटनांबाबत नागरिकांकडून तक्रारी होत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी, महिला आणि ग्रामस्थांमध्ये रात्रीच्या वेळी भीतीचे वातावरण आहे. रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी माकनेर येथील घटनेनंतर ग्रामस्थांनी पोलिस प्रशासनाने ग्रामीण भागात रात्रीची गस्त वाढवावी, संशयित चोरट्यांचा तातडीने शोध घ्यावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी केली आहे. दरम्यान, या घटनेची नोंद मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. चोरट्यांची टोळी कोणती आणि तिचा माग काढण्यासाठी पोलिसांकडून कोणती कारवाई केली जाते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# युवासेनेच्या बळकटीकरणासाठी नव्या दमाच्या युवकांना संधी

जन सम्राट टाईम्स

**पाळधी। प्रतिनिधी:** जळगाव ग्रामीण प्रतिनिधी : “युवक ही संघटनेची खरी ताकद आहे. केवळ पद देणे हा उद्देश नसून काम करण्याची जिद्द, जनतेशी नाळ आणि संघटनेसाठी वेळ देण्याची तयारी असलेल्या नव्या दमाच्या युवकांना जबाबदारी देऊन पुढे आणायचे आहे. जळगाव ग्रामीण विधानसभा मतदारसंघात युवासेनेची मजबूत फळी उभी करून गावागावात संघटन अधिक भक्कम करणार आहोत,” असे प्रतिपादन युवानेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी केले. पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती सोमवारी पाळधी येथे घेण्यात आल्या. या मुलाखतींना दोन्ही तालुक्यांतील युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. युवकांचा सामाजिक सहभाग आणि संघटनात्मक तयारीची घेतली जाणून मुलाखतीदरम्यान प्रतापराव पाटील यांनी इच्छुक युवकांशी थेट संवाद साधत त्यांचा सामाजिक सहभाग, गावातील जनसंपर्क, संघटनात्मक कामाची तयारी आणि युवकांच्या प्रश्नांविषयीची भूमिका जाणून घेतली. युवकांनीही विविध सामाजिक व जनहिताच्या प्रश्नांवर काम करण्याची इच्छा व्यक्त केली. गावपातळीवर संघटना मजबूत करण्यासाठी वेळ देण्याची तयारी अनेक इच्छुकांनी व्यक्त केली. नव्या पिढीला संघटनेत संधी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्ह्याचे पालकमंत्री तथा शिवसेनेचे ज्येष्ठ नेते गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली जळगाव ग्रामीण मतदारसंघात शिवसेना व युवासेनेचे संघटन अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. याचाच एक भाग म्हणून नव्या युवकांना संघटनात्मक प्रवाहात आणून त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रतापराव पाटील “पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी विकासकामांच्या माध्यमातून मतदारसंघातील गावागावाशी नाते जोडले आहे. युवकांशी सातत्याने थेट संपर्क ठेवून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.

# शरद पवार यांच्या दौऱ्याच्या नियोजनासाठी बैठक

## कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकांचे वाटप;



जन सम्राट टाईम्स


**धरणगाव | प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची शरद पवार यांच्या आगामी दौऱ्याच्या नियोजनासाठी बैठक धरणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. बैठकीत लोकनेते एकनाथराव खडसे यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमाच्या नियोजनासह पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर चर्चा करण्यात आली. लोकनेते एकनाथराव खडसे यांच्या ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या अमृत महोत्सवी कार्यक्रमाला शरद पवार उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्यात जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी, संघटनात्मक विषयांवर चर्चा तसेच एकनाथराव खडसे यांना वाढदिवसानिमित्त सदिच्छा भेट देण्याचे नियोजन असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यावेळी अमृत महोत्सव कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविण्याच्या जबाबदाऱ्या पदाधिकाऱ्यांना सोपविण्यात आल्या. तसेच पक्षाच्या विविध संघटनात्मक पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या नवीन पदाधिकाऱ्यांना जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नारायण चौधरी — बैठकीत जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले. तसेच अमृत महोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष कल्पिता पाटील, ज्येष्ठ नेते मोहन पाटील, तालुकाध्यक्ष संजय पाटील, उपाध्यक्ष रमेश महाजन, शहराध्यक्ष लक्ष्मणराव पाटील, कार्याध्यक्ष रविंद्र वाघ, ज्येष्ठ पदाधिकारी भगवान शिंदे, अशोक झुंजारराव, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष खलील (बंटी) खान, जिल्हा युवक कार्याध्यक्ष मोहित पवार, युवक तालुकाध्यक्ष परेश गुजर, युवक शहराध्यक्ष जुनेद बागवान, कार्याध्यक्ष सागर महाले, उपाध्यक्ष समाधान (बालाजी) महाजन, संघटक प्रफुल्ल पवार आदी उपस्थित होते.

# देशमुख महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी यांना जयंतीनिमित्त अभिवादन

## सोप्या काव्यातून जीवनाचे तत्त्वज्ञान मांडणाऱ्या निसर्गकन्येच्या साहित्यिक योगदानाला उजाळा

जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी :** बोलीभाषेतील सहज, साध्या आणि ओघवत्या शब्दांतून मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान मांडणाऱ्या, निसर्गाची विविध रूपे आपल्या कवितेतून साकारत शेतकरी जीवनाचे वास्तव शब्दबद्ध करणाऱ्या निसर्गकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची जयंती सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित या महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. यावेळी त्यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यकर्तृत्वावर प्रकाश टाकत त्यांच्या साहित्याचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर विशद केले. ‘बहिणाबाईंचे काव्य सर्वस्पर्शी’ कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख यांनी प्रास्ताविक केले. “कवयित्री बहिणाबाई चौधरी म्हणजे मराठी साहित्याच्या प्रांतातील एक अनमोल काव्यलेणे आहे.



त्यांच्या कवितेने मानवी जीवनाच्या विविध पैलूंना स्पर्श केला आहे. निसर्ग, पशु-पक्षी, शेतकरी जीवन, सासर-माहेर, सण-उत्सव अशा बहुविध विषयांचे दर्शन त्यांच्या काव्यातून घडते. त्यामुळे त्यांचे काव्य सर्वस्पर्शी झाले आहे,” असे डॉ. देशमुख यांनी सांगितले. जीवनविषयक तत्त्वज्ञान आजच्या तरुण पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यांच्या साहित्याचा परिचय नव्या पिढीला करून देणे आणि त्यांच्या प्रतिभेला अभिवादन करणे हीच कार्यक्रमामागील प्रमुख भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला इतिहास विभागप्रमुख डॉ. सी. एस. पाटील, डॉ. डी. ए. मस्की, प्रा. आर. एम. गजभिये, प्रा. एस. सी. पाटील, डॉ. जनार्दन देवरे, प्रा. प्रवीण देसले, प्रा. श्रद्धा ठाकूर, प्रा. स्नेहा गायकवाड, प्रा. उज्वला पाटील यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अधिकराव पाटील यांनी केले, तर प्रा. ज्योती नन्नवरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ‘अरे संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर; आधी हाताला चटके तेव्हा मिळते भाकर’ या ओळींतून संसारातील संघर्ष आणि जीवनाचे वास्तव मांडणाऱ्या बहिणाबाईंच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण या कार्यक्रमातून करण्यात आले.बोलीभाषेतील सहज, साध्या आणि ओघवत्या शब्दांतून मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान मांडणाऱ्या, निसर्गाची विविध रूपे आपल्या कवितेतून साकारत शेतकरी जीवनाचे वास्तव शब्दबद्ध करणाऱ्या निसर्गकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची जयंती सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित या महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# धरणगावच्या पी.आर. हायस्कूलमध्ये ‘श्रावण धारा’ काव्यवाचन सोहळा रंगला!

## विद्यार्थ्यांच्या मनावर साहित्याची नवी पालवी; निसर्गश्रृंगारासह शेतकऱ्याच्या भावविश्वाचे प्रभावी दर्शन

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** येथील पी.आर. हायस्कूलच्या प्रांगणात ‘श्रावण धारा’ या पावसाच्या कवितांवर आधारित काव्यवाचन सोहळ्याचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध नामवंत कवींच्या पावसाळी कविता प्रभावीपणे सादर करत उपस्थितांना श्रावणाच्या सरींचा साहित्यिक अनुभव दिला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मनावर साहित्याची नवी पालवी फुलविण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मंगेश पाडगावकर यांच्या ‘टप टप थेंब वाजती’ या गीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एस. पाटील होते. यावेळी पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कोळी आणि मराठी विभागप्रमुख डॉ. बापू शिरसाठ मंचावर उपस्थित होते. मुख्याध्यापकांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर बालकवींच्या ‘श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे’ या अमर ओळींनी वातावरणात श्रावण फुलविला. पावसाच्या विविध रूपांचा काव्यातून आविष्कार प्रास्ताविकात डॉ. बापू शिरसाठ यांनी पावसाकडे केवळ एका दृष्टिकोनातून न पाहता त्याच्या विविध रूपांचे दर्शन विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून घडविणे, हा कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी बालकवी ठोंबरे यांच्या ‘श्रावणमास’, ‘निर्झरास’, ‘फुलराणी’, ‘औदुंबर’, बा. भ. बोरकर यांच्या ‘घन येती



घिरट्या घालिती’, ग. दि. माडगूळकर यांच्या ‘घन घन माला नभी दाटल्या’, ‘कोसळती धारा’, ना. धों. महानोर यांच्या ‘नभ उतरू आलं’, ‘चिंब थरथरलं’,‘अंग झिम्माड झालं’,‘हिरव्या बहरात’, अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या ‘नभ मेघांनी आक्रमिले’, कवी ग्रेस यांच्या ‘पाऊस कधीचा पडतो’, भा.रा.तांबे यांच्या ‘पिवळे तांबूस ऊन कोवळे’, शांता शेळके यांच्या ‘वादळ वारं सुटलं गो’, मंगेश पाडगावकर यांच्या ‘श्रावणात घन निळा बरसला’ तसेच आरती प्रभू यांच्या ‘ये रे घना, ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना’ आदी कविता सादर केल्या. या कवितांमधून विद्यार्थ्यांनी पावसातील निसर्गश्रृंगार, हिरवाई, जलधारा तसेच शेतकऱ्याच्या डोळ्यांतील पावसाची आस आणि भावविश्व प्रभावीपणे जिवंत केले. ‘कविता हे निसर्गाशी जोडणारे सुंदर माध्यम’ यावेळी पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कोळी यांनी मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांना निसर्गाशी जोडण्यासाठी कविता हे सर्वांत सुंदर माध्यम असल्याचे सांगितले. ” असे नमूद करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान शिक्षक गोपाल चौधरी यांनी ‘असा रंगारी श्रावण’ ही कविता गाऊन उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या काव्यसादरीकरणामुळे प्रत्येकाच्या मनात मात्र श्रावणाच्या सरी बरसत असल्याचा अनुभव उपस्थितांना आला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या काव्यवाचन सोहळ्यात त्रिवेणी पाटील, उर्मिला वाणी, रीना सोनवणे, विभा शिरसाठ, हर्षदा गोरखा, भावना सोनवणे, यशस्वी मुजगे, आराध्या पवार, प्रथमेश माळी, प्रशांत पाटील, डिंपल बडगुजर, गुंजन कोळी, इशिता पाटील, भाग्यश्री कोळी, आरोही भील, उपासना पाटील, तेजस्विनी पाटील, हर्षाली पाटील, प्रांजल धनगर आदी विद्यार्थ्यांनी पाऊस व निसर्गावर आधारित कविता सादर केल्या.

# रक्षाबंधनाआधी ‘लाडक्या बहिणीं’ना मानधनाची प्रतीक्षा!

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल | प्रतिनिधी :** रक्षाबंधनाचा सण अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपला असताना राज्य शासनाच्या ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेअंतर्गत मिळणारे १,५०० रुपयांचे मानधन अद्याप अनेक लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झालेले नाही.

त्यामुळे सणाच्या पार्श्वभूमीवर एरंडोल तालुक्यातील लाडक्या बहिणींचे लक्ष आता मानधनाच्या रकमेच्या जमा होण्याकडे लागले आहे. रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा सण असल्याने या काळात महिलांना विविध वस्तूंच्या खरेदीसाठी अतिरिक्त खर्च करावा लागतो. शासनाकडून मिळणारे मानधन सणापूर्वी खात्यात जमा झाल्यास राखी, फराळ तसेच घरातील आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी त्याचा उपयोग होऊ शकतो, अशी अपेक्षा लाभार्थी महिलांकडून व्यक्त होत आहे.

महागाईच्या काळात मानधनाचा घरखर्चाला हातभार सध्याच्या वाढत्या महागाईच्या काळात मिळणारे १,५०० रुपये हे रक्कम लहान वाटत असली तरी घरसंसारातील अडचणीच्या काळात त्याचा चांगला हातभार लागत असल्याचे लाभार्थी महिलांचे म्हणणे आहे.

किराणा, औषधे, मुलांच्या गरजा किंवा अन्य दैनंदिन खर्चासाठी ही रक्कम काही प्रमाणात आधार देत असल्याने महिलांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. शासनाकडून स्पष्टतेची अपेक्षा मानधनाची रक्कम नेमकी कधी खात्यात जमा होणार, याबाबत लाभार्थी महिलांमध्ये उत्सुकता कायम आहे. रक्षाबंधनापूर्वी पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात मानधनाची रक्कम जमा करावी आणि याबाबत शासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे. ‘सणाच्या दिवसांत हाताशी आलेली ही मदत घरखर्चासाठी उपयोगी ठरेल,’ अशी अपेक्षा लाडक्या बहिणींकडून व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# स्थानिक व्यावसायिकांना लळींग टोलमध्ये सूट द्या!

## स्थानिक वाहनांना टोलमाफी बंद



जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी :** लळींग येथील टोल नाक्यावर स्थानिक व्यावसायिक व २० किलोमीटरच्या परिसरातील वाहनधारकांना टोल आकारणीत पूर्वीप्रमाणे सूट द्यावी, अशी मागणी धुळे जिल्हा ट्रक मालक असोसिएशन व उत्तर महाराष्ट्र ट्रक ओनर्स असोसिएशन संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात निदर्शने करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. स्थानिक वाहन व्यावसायिकांकडून मोठ्या प्रमाणात टोल आकारणी होत असल्याने वाहतूक व्यवसायावर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे असोसिएशनचे म्हणणे आहे. स्थानिक वाहनधारकांना टोलमधून सूट मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. नवीन ठेकेदारामुळे सूट बंद झाल्याचा आरोप असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, २००९ पासून लळींग टोल नाक्यावर स्थानिक तसेच जिल्ह्यातील व्यापारी व व्यावसायिक वाहनांना टोल आकारणीत सूट मिळत होती. मात्र, गेल्या तीन दिवसांपूर्वी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (NHAI) नवीन ठेकेदार नियुक्त केल्यानंतर स्थानिक वाहनांना मिळणारी सूट बंद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक वाहनचालक व मालवाहतूक व्यावसायिकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, पूर्वीची टोलसवलत तातडीने लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने स्थानिक वाहन व्यावसायिकांच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात निदर्शने केली. स्थानिक वाहतूकदारांना दिलासा मिळावा आणि टोल आकारणीबाबत पूर्वीची व्यवस्था कायम ठेवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. मागण्या तातडीने मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. यावेळी धुळे जिल्हा ट्रक मालक असोसिएशन व उत्तर महाराष्ट्र ट्रक ओनर्स असोसिएशन संघर्ष समितीचे दिनेश चंद्र शर्मा, हरीश विभुते, मांगीलाल चौधरी, प्रमोद पाटील, जगदीश चौधरी, राजेंद्र तीडमे, दिलीप कापसे, राजेश चौधरी, महेश अहिरराव, दिनेश परदेशी, मोनेंद्र मेहता, कैलास पाटील, मसुद शेख, सईद सिकंदर शेख, वसीम मुस्ताक शेख, नासिर हुसेन शेख यांच्यासह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# आरक्षण व संविधानाच्या संरक्षणासाठी यावलमध्ये विराट एल्गार मोर्चा!

## अनुसूचित जातींच्या आरक्षणातील वर्गीकरणाला तीव्र विरोध

जन सम्राट टाईम्स




**यावल । प्रतिनिधी:** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील वर्गीकरणाला विरोध, आरक्षणाचे संरक्षण तसेच भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्कांच्या रक्षणाच्या मागणीसाठी यावल शहरात विराट एल्गार मोर्चा काढण्यात आला. तालुक्यातील विविध गावांमधून आलेल्या नागरिकांनी मोर्चात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आयोजकांच्या माहितीनुसार, दहा हजारांहून अधिक समाजबांधव या मोर्चात सहभागी झाले होते. मोर्चादरम्यान ‘आरक्षण वाचवा, संविधान वाचवा’, ‘अनुसूचित जातींचे आरक्षण अबाधित ठेवा’, ‘सामाजिक न्यायाचा विजय असो’ अशा घोषणांनी यावल शहराचा परिसर दुमदुमून गेला. हातात फलक, बॅनर आणि संविधानाच्या संरक्षणाचा संदेश देणारे विविध फलक घेत नागरिक मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. आरक्षणातील वर्गीकरणाला विरोध अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये करण्यात येणाऱ्या वर्गीकरणाला विरोध करणे हा मोर्चाचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. आरक्षणाला प्राप्त घटनात्मक संरक्षण कायम ठेवावे आणि आरक्षणाच्या मूळ उद्देशाला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचू नये, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. आरक्षण हा केवळ सवलतीचा विषय नसून, सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना समान संधी आणि प्रतिनिधित्व मिळवून देण्याशी संबंधित संविधानिक व्यवस्था असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यामुळे अनुसूचित जातींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी समाजाने एकजुटीने आवाज उठविण्याचे आवाहन करण्यात आले. गावागावांतून नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यावल तालुक्यातील विविध गावांमधून महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले. हजारोंच्या संख्येने नागरिक एकत्र आल्याने शहरातील प्रमुख मार्गांवर मोठी गर्दी झाली होती. संविधान, आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या समर्थनार्थ फलक घेऊन सहभागी झालेल्या नागरिकांमुळे संपूर्ण वातावरण आंदोलनमय झाले होते. या मोर्चाच्या माध्यमातून अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या प्रश्नावर समाजाची भूमिका आणि एकजूट शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# दस्तापूर जि.प. शाळेची दुरवस्था; शाळेसमोर घाणीचे साम्राज्य!

## किचन शेडची पडझड विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

जन सम्राट टाईम्स



**दस्तापूर । (प्रतिनिधी):** तालुक्यातील दस्तापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. किचन शेड तसेच स्वच्छतागृहाची पडझड झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून, यामुळे शाळेतील लहान विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेच्या परिसरातील अस्वच्छतेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष गणेश बळीराम सोनवणे यांनी केला आहे. शाळेतील मुख्याध्यापकांना याबाबत वेळोवेळी तोंडी सूचना करूनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचे सोनवणे यांनी सांगितले. गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी २४ ऑगस्ट २०२६ रोजी गणेश सोनवणे यांनी पंचायत समिती, सोयगाव येथील गटशिक्षणाधिकाऱ्यांना लेखी निवेदन दिले. शाळेसमोरील घाण तातडीने साफ करून विद्यार्थ्यांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शाळेच्या परिसरात साचलेल्या घाणीमुळे विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असून, अस्वच्छतेमुळे विविध आजारांची लागण होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पडझड झालेल्या किचन शेड आणि स्वच्छतागृहाचीही तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दोन दिवसांत स्वच्छता करा, अन्यथा आंदोलन शाळेच्या परिसरातील घाण दोन दिवसांत साफ न केल्यास पंचायत समिती, सोयगावसमोर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा तालुकाध्यक्ष गणेश सोनवणे यांनी प्रशासनाला दिला आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन शाळेचा परिसर स्वच्छ करावा तसेच पडझड झालेल्या शेड व स्वच्छतागृहाची आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांकडूनही होत आहे. छायाचित्र ओळ : गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष गणेश सोनवणे.

# रिंगणगाव बाजारपेठेत गटारीचे दुर्गंधीयुक्त दूषित पाणी; ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल । प्रतिनिधी:** रिंगणगाव येथील बाजारपेठ परिसरात गटारीचे दुर्गंधीयुक्त व दूषित पाणी रस्त्यावर साचत असल्याने ग्रामस्थांसह भाजीपाला विक्रेते व व्यापाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. साचलेल्या सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढण्यासह विविध आजारांना पोषक वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. बाजारपेठेत सांडपाणी; नागरिक त्रस्त गावातील बाजारपेठ हा नागरिकांची मोठी वर्दळ असलेला परिसर आहे. याच ठिकाणी गटारीचे दूषित पाणी साचत असल्याने नागरिकांना त्यातून मार्ग काढावा लागत आहे. भाजीपाला विक्रेते आणि ग्राहकांनाही या अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे.

सांडपाण्याची नियमित विल्हेवाट न लावल्याने दुर्गंधी आणि डासांचा त्रास वाढत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीने



तातडीने गटारींची स्वच्छता करून सांडपाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. ‘ग्रामसेवक धूमकेतूसारखे उगवतात’ ग्रामस्थांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायतीची यंत्रणा नियमितपणे कार्यरत असणे अपेक्षित असताना नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी वारंवार ग्रामपंचायतीचे उंबरठे झिजवावे लागत असल्याची नाराजी आहे. ग्रामसेवक नियमितपणे ग्रामपंचायतीत उपस्थित राहत नसून धूमकेतूसारखे अधूनमधून उगवतात, अशी उपरोधिक तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रशासकाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्त असतानाही गावातील स्वच्छता, गटारींची देखभाल आणि नागरिकांच्या तक्रारी सोडविण्याबाबत प्रभावी कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. ‘प्रशासकही नावालाच’ असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# अनधिकृत शाळांविरोधातील आंदोलनाला प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद

## आठ दिवसांत कार्यवाही अहवाल देण्याचे शिक्षण विभागाचे आश्वासनठ

जन सम्राट टाईम्स



**पुणे | प्रतिनिधी:** पुणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत शाळांवर कारवाई करावी, विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करावी तसेच शैक्षणिक गुणवत्तेसंदर्भातील विविध मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, या मागण्यांसाठी इनक्रेडिबल सोशल वर्कर ग्रुपच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची शिक्षण विभागाने गांभीर्याने दखल घेतली असून, आंदोलकांनी मांडलेल्या मागण्यांवर आवश्यक कार्यवाही करून आठ दिवसांत अंमलबजावणी अहवाल सादर करण्याचे आश्वासन प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहे. पुणे शहरातील अनधिकृत शाळांच्या प्रश्नावर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. अनधिकृत शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असून, विद्यार्थ्यांना नियमबद्ध आणि दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक असल्याची भूमिका आंदोलकांनी मांडली. ‘हा लढा शाळांविरोधात नव्हे, अनधिकृत शिक्षण व्यवस्थेविरोधात’ यावेळी आंदोलकांनी स्पष्ट भूमिका मांडताना, “हा लढा कोणत्याही शाळेविरोधात नसून अनधिकृत शिक्षण व्यवस्थेविरोधात आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसोबतच त्यांना दर्जेदार व नियमबद्ध शिक्षण मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे,” असे सांगितले. अनधिकृत शाळांबाबत प्रशासनाने योग्य ती तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. विविध संघटनांचा सक्रिय सहभाग आंदोलनाला विविध समविचारी सामाजिक संघटनांनी सक्रिय पाठिंबा दर्शविला. यावेळी कबीर शेख (भारतीय), हरीषदादा मोहीले (आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ), असलम बागवान (इनक्रेडिबल सोशल वर्कर ग्रुप) यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांबरोबरच त्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. प्रशासनाने आंदोलकांच्या मागण्यांची दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिल्याने आंदोलनाला महत्त्वपूर्ण यश मिळाल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. आठ दिवसांत काय कारवाई होते, याकडे लक्ष शिक्षण विभागाने मागण्यांवर आवश्यक कार्यवाही करून आठ दिवसांत अंमलबजावणी अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आता प्रशासनाकडून प्रत्यक्षात कोणती पावले उचलली जातात, याकडे पालक, विद्यार्थी आणि सामाजिक संघटनांचे लक्ष लागले आहे. अनधिकृत शाळांचा प्रश्न केवळ प्रशासकीय कारवाईपुरता मर्यादित नसून तो विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता, शैक्षणिक गुणवत्ता आणि भविष्यासोबत संबंधित असल्याने प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली.

# नाहाटा महाविद्यालयात ‘संज्ञापन कौशल्ये’ विषयावर मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** येथील कला, विज्ञान आणि पु. ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात संज्ञापन कौशल्ये समितीच्या वतीने २५ ऑगस्ट रोजी ‘संज्ञापन कौशल्ये’ या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे होते. प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथील कॅप्टन डॉ. राजेंद्र आर. राजपूत उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. डॉ. जी. आर. वाणी तसेच समितीप्रमुख प्रा. डॉ. रश्मी शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. कॅप्टन डॉ. राजेंद्र राजपूत यांनी विद्यार्थ्यांना संज्ञापन कौशल्ये, व्यावहारिक कौशल्ये, जीवनातील संज्ञापनाचे महत्त्व, परिणामकारक संवादासाठी आवश्यक कौशल्ये, भाषा, देहबोली, समयसूचकता आणि व्यवस्थापन कौशल्ये याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जीवनात आपले ध्येय निश्चित करून त्या ध्येयावर प्रेम करावे आणि ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांनी भविष्यात यशस्वी होण्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. महाविद्यालयातील विविध समित्यांच्या माध्यमातून आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. यशस्वी करिअरसाठी संज्ञापन कौशल्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीप्रमुख प्रा. डॉ. रश्मी शर्मा यांनी केले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महाविद्यालय व संज्ञापन कौशल्ये समितीच्या माध्यमातून नियमितपणे विविध उपक्रम आयोजित केले.

# महावितरणचे धाराशिव मंडळ कार्यालयातील अधीक्षक अभियंता संजय आडे निलंबित!

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित अर्थात महावितरणच्या धाराशिव मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय श्रावण आडे यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. महावितरणच्या प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून २४ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. धाराशिव मंडळाच्या कार्यक्षेत्रातील खालावलेली कामगिरी आणि विविध कामांमधील अनियमितता यामुळे निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. वीजहानीत मोठी वाढ धाराशिव मंडळाच्या कार्यक्षेत्रात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये लघुदाब वाहिनीची वितरण व AT&C वीजहानी १९.७८ टक्के होती. मात्र, आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीतच ती वाढून ३०.३७ टक्क्यांवर पोहोचली. वीजहानी कमी करण्याच्या दृष्टीने अपेक्षित कामगिरी न झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. १७ हजारांहून अधिक ग्राहकांची पडताळणी प्रलंबित मंडळाच्या कार्यक्षेत्रात स्वयंचलितपणे वीजपुरवठा खंडित झालेल्या १७,३९८ वीजग्राहकांची पडताळणी प्रलंबित असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. यापैकी ३९.२ टक्के ग्राहकांची




पडताळणी अद्याप बाकी असल्याने ही बाब गंभीर स्वरूपाची असल्याचे स्पष्ट करण्यात आले. वीजचोरी रोखण्यात अपयशाचा ठपका धाराशिव मंडळाला २,४०० वीजचोरी प्रकरणे पकडण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र, एप्रिल ते जुलै २०२६ या कालावधीत केवळ ३५९, तर ऑगस्ट २०२६ मध्ये केवळ ४० वीजचोरीची प्रकरणे पकडण्यात आली. याशिवाय पडताळणी करण्यात आलेल्या ग्राहकांपैकी १,१५० ग्राहकांकडून बेकायदेशीर वीजवापर होत असल्याचे आढळून आले. मात्र, यापैकी एकाही प्रकरणात प्रथम खबर अहवाल (FIR) दाखल करण्यात आला नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. ट्रान्सफॉर्मर बिघाड आणि फीडर ट्रिपिंगमध्ये वाढ आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या तुलनेत २०२६-२७ मध्ये पॉवर ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होण्याचे प्रमाण ५० टक्क्यांनी वाढले आहे. तसेच डीटीसी नादुरुस्तीचे प्रमाणही ५.६८ टक्क्यांवरून ५.७४ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे निदर्शनास आले. धाराशिव मंडळातील औद्योगिक फीडर तसेच ३३ केव्ही तामलवाडी आणि ३३ केव्ही येणेगूर यांसारख्या EHV फीडरवरील ट्रिपिंगचे प्रमाण वाढले असून, याबाबत सूचना देऊनही अपेक्षित सुधारणा झाली नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. ५००० रुपयांपेक्षा अधिक थकबाकीदारांवरही कारवाई अपुरी ५,००० रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या ३४,२१६ ग्राहकांपैकी केवळ १०,३२१ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तब्बल २०,७९६ थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा अद्याप सुरू असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे थकबाकी वसुली आणि वीजपुरवठा खंडित करण्याच्या कारवाईतही अपेक्षित कार्यक्षमता दिसून आली नसल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. निलंबन काळात मुख्यालय सोडण्यास मनाई महावितरण कंपनी कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील नियम ८८ (क) व अनुसूची 'ग' नुसार संजय आडे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. निलंबनाच्या कालावधीत त्यांना मुख्य अभियंता, परिमंडल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दर सोमवार आणि शुक्रवार या कार्यालयीन दिवशी सकाळी ठीक १० वाजता हजेरी द्यावी लागणार आहे. तसेच मुख्य अभियंत्यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# 44 वर्षांपासून पिकांचे नुकसान; अन्यायग्रस्त शेतकरी शांताराम कोळी यांचे आमरण उपोषण

## बोदवड तहसील कार्यालयासमोर उपोषण; ८२ लाखांहून अधिक नुकसान झाल्याचा दावा

जन सम्राट टाईम्स

**बोदवड। प्रतिनिधी :** शेलवड शिवारातील गट क्रमांक ३०४/१ मधील शेतीचे गेल्या ४४ वर्षांपासून लघुसिंचन विभागाच्या तलावातील पाण्यामुळे सातत्याने नुकसान होत असल्याचा आरोप करत अन्यायग्रस्त शेतकरी शांताराम कोळी यांनी बोदवड तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या कालावधीत आपल्या पिकांचे ८२ लाख रुपयांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा दावा कोळी यांनी निवेदनातून केला आहे. तलावाच्या पाण्यामुळे ४४ वर्षांपासून शेतीचे नुकसान शांताराम कोळी यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या शेतात लघुसिंचन जिल्हा परिषदेच्या तलावाचे पाणी साचून गेल्या ४४ वर्षांपासून पिकांचे सातत्याने नुकसान होत आहे. या नुकसानीमुळे कुटुंब आर्थिक संकटात सापडले असून सध्या ३० लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज त्यांच्या डोक्यावर आहे. कर्जाचे व्याज व हप्त्यांसाठी दरमहा ४० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम द्यावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले. लघुसिंचन विभागाने शेतीचे नुकसान झाल्याचे मान्य केले असले तरी नुकसानभरपाई देण्यासाठी आवश्यक तरतूद नसल्याचे सांगण्यात आल्याचा दावा कोळी यांनी केला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागातील जलसंधारण अधिकाऱ्यांना विशेष अधिकार देऊन नुकसानभरपाईचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. पीकविमा, ज्वारी खरेदीबाबतही तक्रारी सन २०२४-२५ मध्ये अतिपावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

महसूल विभागाने १०० टक्के नुकसान झाल्याचा पंचनामा केला असतानाही ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने पीकविमा दावा नाकारल्याचा आरोप कोळी यांनी केला आहे. तसेच सन २०२३-२४ मधील शासकीय ज्वारी खरेदी प्रक्रियेत बोदवड को-ऑप. परचेस अँड सेल्स युनियन लिमिटेड, बोदवड यांनी आपली ज्वारी खरेदी केली नाही आणि उलट बदनामी केल्याची तक्रारही संबंधित शेतकऱ्याने तहसीलदारांकडे केली असल्याचे निवेदनात नमूद आहे. शिवभोजन केंद्राचे बिलही दोन वर्षांपासून प्रलंबित



शांताराम कोळी हे बोदवड येथे 'जय महाराष्ट्र भोजनालय' या नावाने शिवभोजन केंद्र चालवत होते. ऑक्टोबर २०२४ पासून केंद्राच्या ठिकाणी अॅप कार्यरत नसल्याने नवीन जागेत स्थलांतर करण्यासाठी अर्ज करूनही दोन वर्षांनंतरही परवानगी मिळालेली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. शिवभोजन केंद्राचे गेल्या दोन वर्षांपासून बिल प्रलंबित असून, १६ महिन्यांपासून केंद्र बंद असल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा कोळी यांनी केला आहे. शेतरस्त्यापासून ४४ वर्षांपासून वंचित लघुसिंचन प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जिल्हा परिषदेमार्फत शेतरस्ता संपादित करण्यात आला; मात्र त्याबदल्यात पर्यायी शेतरस्ता उपलब्ध करून देण्यात आला नसल्याचे कोळी यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे गेल्या ४४ वर्षांपासून शेतीपर्यंत पोहोचण्यासाठीही अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा त्यांचा आरोप आहे. तीन पिढ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याचा दावा सततच्या नुकसानीमुळे तीन पिढ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले असून मुलांचे शिक्षणही अर्धवट राहिले, अशी व्यथा कोळी यांनी व्यक्त केली आहे. आपल्या तीन मुलांना शासकीय सेवेत सामावून घेऊन कुटुंबाचे पुनर्वसन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. सन २०२४ मध्ये जिल्हा परिषद, जळगाव कार्यालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न करूनही शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीपासून आपल्याला वंचित ठेवण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. दि. ४ जुलै २०१८ रोजी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मनरेगा अंतर्गत तलावातील गाळ शेतात टाकण्याचे काम मंजूर झाले होते. मात्र, पंचायत समिती बोदवड स्तरावरून या कामास हेतुपुरस्सर विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून त्यांना शिक्षा करावी, अशी मागणीही उपोषणकर्त्याने केली आहे. शेतीचे नुकसान, कर्जबाजारीपणा, पीकविमा, शासकीय खरेदी, शेतरस्ता, शिवभोजन केंद्र आणि पुनर्वसन अशा विविध प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन न्याय मिळावा, अशी मागणी शांताराम कोळी यांनी केली आहे.तलावाच्या पाण्यामुळे ४४ वर्षांपासून शेतीचे नुकसान शांताराम कोळी यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या शेतात लघुसिंचन जिल्हा परिषदेच्या तलावाचे पाणी साचून गेल्या ४४ वर्षांपासून पिकांचे सातत्याने नुकसान होत आहे. या नुकसानीमुळे कुटुंब आर्थिक संकटात सापडले असून सध्या ३० लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज त्यांच्या डोक्यावर आहे. कर्जाचे व्याज व हप्त्यांसाठी दरमहा ४० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम द्यावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

# संत शिरोमणी नरहरी महाराजांची ८३३ वी जयंती भक्तिमय वातावरणात साजरी !

## अभिषेक, महापूजन व महाआरतीसह विविध धार्मिक-सामाजिक उपक्रम; संत नरहरी सेवकांचा सत्कार

जन सम्राट टाईम्स

**धुळे | (प्रतिनिधी):** सुवर्णकार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री नरहरी महाराजांची ८३३ वी जयंती मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी धुळे शहरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संत नरहरी महाराजांनी आपल्या आचार-विचारातून भक्ती, प्रामाणिकपणा, कष्ट, सामाजिक एकोपा आणि मानवतेचा संदेश समाजाला दिला. हरि-हर ऐक्याचा महान विचार समाजासमोर ठेवणाऱ्या संत नरहरी महाराजांचे कार्य आणि विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अभिषेक, महापूजन व महाआरती जयंतीनिमित्त संत नरहरी महाराज स्मारक येथे महाराजांच्या चरणी अभिषेक, महापूजन व आरती करण्यात आली. तसेच सुवर्णकार भवन, कल्याण नंबर ५ येथेही संत नरहरी महाराजांचा विधिवत अभिषेक व महाआरती करण्यात आली. दर रविवारी संत नरहरी महाराज स्मारक येथे स्वच्छता अभियान राबवून पाद्यपूजन करणाऱ्या संत नरहरी सेवकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच १५ ऑगस्ट रोजी पोलीस दलात राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त



मान्यवरांचाही या ठिकाणी सन्मान करण्यात आला. संत नरहरी महाराजांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी संत नरहरी महाराजांनी भक्ती आणि कर्म यांची सांगड घालत समाजाला सदाचाराचा मार्ग दाखविला. त्यांच्या विचारांतून सामाजिक एकता, परिश्रम, प्रामाणिकपणा आणि मानवतेचा संदेश मिळतो. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रम राबवून त्यांच्या विचारांना कृतीतून अभिवादन करण्यात आले. या जयंती सोहळ्यास सुवर्णकार समाजातील बांधव, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमास अध्यक्ष चंद्रकांत मधुकर सोनार, सुनील देवरे, जगदीश देवपूरकर, अजय नाशिककर, नगरसेवक देवेंद्र सोनार, राजेंद्र बारकू जाधव, गोटू पोतदार, युवक संघटनेचे अध्यक्ष नकुल सुरेश अहिरराव, महिला मंडळ अध्यक्ष श्रीमती उषा देवपूरकर, विजय पिंगळे, भूषण सोनार, अनिल पिंगळे, गौरव राजेंद्र पिंगळे, अनिल देवपूरकर, श्याम सोनार, रमेश पोद्दार, दीपक वारकर, संदीप गोरनेकर, महेंद्र विसपुते, मनोज वाघ, रवींद्र विभांडिक, अंकुर सोनार, दिलीप सोनार, सुरेश जडे, राकेश गाळणकर, दिग्विजय गाळणकर, पुरुषोत्तम सोनार, दिलीप रणधीर, धनंजय सातभाई, वसंत बागुल, विजय बाविस्कर, चेतन जडे, हर्षल देवपूरकर, रविराज सोनार, चंद्रकांत घोडके, प्रितेश बाविस्कर, अविनाश थोरात, संजय दुसाने, राम निकुंभ आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

# 'आपले सरकार' सेवा केंद्रांवर राजकीय फोटोंविना द्या

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर' विषयावर भरत शिरसाठ यांचे प्रभावी धम्मप्रवचन

जन सम्राट टाईम्स

**पाडळदा| प्रतिनिधी :** : नागरिकांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शासकीय सेवा उपलब्ध करून देणाऱ्या 'आपले सरकार' सेवा केंद्रांच्या अधिकृत कॉमन ब्रँडिंग फलकांवर राजकीय नेत्यांची छायाचित्रे वापरू नयेत, अशी आग्रही मागणी VLE संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. 'आपले सरकार' सेवा केंद्रांचा उद्देश नागरिकांना पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने शासकीय सेवा उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे ही केंद्रे पूर्णपणे



बिगरराजकीय व निष्पक्ष शासकीय सेवा केंद्रे म्हणून ओळखली जावीत, यासाठी कॉमन ब्रँडिंगमध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा अन्य राजकीय व्यक्तींची छायाचित्रे नसावीत, अशी भूमिका संघटनेने मांडली. आचारसंहितेच्या काळात व्यावहारिक अडचणींची शक्यता निवडणूक काळात लागू होणारी आचारसंहिता, राजकीय बंद किंवा अन्य संवेदनशील परिस्थितीत सेवा केंद्रांच्या फलकांवरील राजकीय छायाचित्रांमुळे केंद्रचालकांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. तसेच सेवा केंद्रे राजकीय वाद किंवा चर्चेच्या केंद्रस्थानी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आचारसंहितेच्या काळात फलक झाकणे, हटवणे किंवा त्यामध्ये बदल करणे यासारख्या तांत्रिक व व्यावहारिक समस्या निर्माण होऊ नयेत, यासाठी राजकीय व्यक्तींच्या छायाचित्रांशिवाय स्वतंत्र कॉमन ब्रँडिंग उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी स्वीकारले निवेदन संघटनेच्या वतीने देण्यात आलेले निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी आशा सांगवी यांनी स्वीकारले. यावेळी VLE संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश ढोढरे, जुनेद मन्सार, राजूशहा, फरीद बेलदार, अजीम पटवे, खालिद शेख यांच्यासह संघटनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# मैत्रेय बुद्ध विहारात वर्षावास प्रवचन मालिकेचे सहावे पुष्प संपन्न

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ| प्रतिनिधी :** मैत्रेय बुद्ध विहार, नालंदा नगर, भुसावळ येथे भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व यांच्या वतीने आयोजित जळगाव पूर्व वर्षावास धम्म प्रवचन मालिकेतील सहावे पुष्प उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.

यावेळी केंद्रीय शिक्षिका तथा जिल्हा पर्यटन सचिव, भारतीय बौद्ध महासभा जळगाव पूर्व यांच्या आयु. नि. विद्याताई झणके यांनी 'सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी अत्यंत सोप्या, सहज आणि समजेल अशा भाषेत डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञान, संघर्ष, विचार आणि सामाजिक योगदानाची विविध उदाहरणांसह माहिती दिली.

डॉ. आंबेडकरांचे विचार समाजासाठी दिशादर्शक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व, सामाजिक समता, स्वाभिमान आणि मानवमुक्तीसाठी केलेला संघर्ष यांचा उहापोह विद्याताई झणके यांनी आपल्या प्रबोधनातून केला. ज्ञानाच्या माध्यमातून समाजाला सक्षम करण्याचा बाबासाहेबांचा विचार प्रत्येकाने आचरणात आणावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष आद. प्रियंकाताई अहिरे, शहर संघटक आद. नि. सुजाताताई जंजाळे, शहर संघटक आद. नि. वर्षाताई जाधव, शहर संघटक आद. नि. घायतडक ताई, आद. अनुसयाताई डी. अहिरे, आद. सुमनताई पवार, आद. सीमाताई बावसकर, आद. नि. माधुरीताई भालेराव यांच्यासह शहर कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते. तसेच परिसरातील श्रद्धाशील व धम्मनिष्ठ बौद्ध उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रवचनाचा लाभ घेतला. वर्षावासाच्या निमित्ताने आयोजित या प्रवचनमालेमुळे परिसरात धम्मविचार आणि सामाजिक प्रबोधनाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# कासारखेड्यात कानबाई उत्सव उत्साहात; खानदेशी परंपरेचा जागर

## अहिराणी लोकगीतांच्या गजरात कानबाई मातेची मिरवणूक, ग्रामस्थांनी जपला सांस्कृतिक वारसा

जन सम्राट टाईम्स

**कासारखेडा | प्रतिनिधी:** खानदेशच्या लोकसंस्कृतीत श्रद्धेचे आणि परंपरेचे विशेष स्थान असलेला कानबाई उत्सव कासारखेडा येथे यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. महिला वर्गासह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पारंपरिक पद्धतीने उत्सवाची सांगता केली. खानदेशातील लोकपरंपरेनुसार कानबाई मातेला पार्वतीचे स्वरूप मानले जाते. श्रावण महिन्यातील पहिल्या किंवा दुसऱ्या रविवारी कानबाई मातेची स्थापना करण्याची पूर्वापार परंपरा आहे. या उत्सवाच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धेसोबतच



खानदेशी लोकसंस्कृती आणि अहिराणी परंपरेचे जतन केले जाते. पारंपरिक पद्धतीने कानबाईची स्थापना उत्सवाच्या मुख्य दिवशी घराघरांत तसेच मुख्य मंडपात कानबाई मातेच्या मुखवट्याची विधिवत स्थापना करण्यात आली. यानिमित्त महिलांनी दिवसभर पारंपरिक गाणी, फुगड्या आणि अहिराणी लोकगीतांच्या माध्यमातून जागर केला. कानबाई मातेला पारंपरिक 'कानबाईचा रोट' या विशेष नैवेद्याचा प्रसाद अर्पण करून महाआरती करण्यात आली. या धार्मिक सोहळ्यास महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अहिराणी गीतांच्या तालावर विसर्जन मिरवणूक दुसऱ्या दिवशी पहाटेपासूनच कानबाई मातेच्या विसर्जन मिरवणुकीची लगबग सुरू झाली. 'कानबाई माय निघाली गवूच्या शेतामधी...' अशा अहिराणी लोकगीतांच्या तालावर आणि कानबाई मातेच्या जयघोषात महिलांनी डोक्यावर घट घेत मिरवणुकीत सहभाग घेतला. ढोल-ताशे, पारंपरिक गीते आणि भक्तांच्या जयघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. स्थानिक नदीपात्र अथवा पाण्याच्या स्रोताजवळ विधिवत पूजन करून कानबाई मातेला भावपूर्ण निरोप देण्यात आला. संदेश कानबाई उत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून खानदेशच्या सामाजिक एकतेचा, कौटुंबिक बंधुभावाचा आणि अहिराणी लोकसंस्कृतीच्या समृद्ध वारशाचा उत्सव मानला जातो. उत्सवादरम्यान गायली जाणारी कानबाईची पारंपरिक गाणी हा खानदेशी लोकसाहित्याचा अमूल्य ठेवा आहे. कासारखेड्यातही सर्व समाजघटकांतील ग्रामस्थांनी एकत्र येत उत्सव साजरा केला. त्यामुळे गावात आनंद, उत्साह आणि सलोख्याचे वातावरण निर्माण झाले. नव्या पिढीपर्यंत पारंपरिक संस्कृती पोहोचविण्यासाठी अशा उत्सवांचे महत्त्व अधोरेखित झाले.खानदेशच्या लोकसंस्कृतीत श्रद्धेचे आणि परंपरेचे विशेष स्थान असलेला कानबाई उत्सव कासारखेडा येथे यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. महिला वर्गासह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पारंपरिक पद्धतीने उत्सवाची सांगता केली. खानदेशातील लोकपरंपरेनुसार कानबाई मातेला पार्वतीचे स्वरूप मानले जाते.

# 'हर हर महादेव'च्या जयघोषात धुळे ते उज्जैन पदयात्रा!

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** 'हर हर महादेव', 'भोलेनाथ महाराज की जय' अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला असताना धुळे ते उज्जैन पदयात्रेला मोठ्या भक्तिभावात सुरुवात झाली. श्रावण महिन्याचे औचित्य साधून चितोड रोडवरील तुळसाबाईचा मळा परिसरातील भोलेनाथ हनुमान मंदिर समितीच्या वतीने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दहा दिवसांच्या या पदयात्रेत सहभागी भाविक उज्जैन येथे पोहोचून भगवान महाकालाचे दर्शन घेणार आहेत. पहिल्यांदाच धुळ्यातून उज्जैनकडे पदयात्रा श्रावण महिन्यात भगवान महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांमध्ये विशेष उत्साह असतो. पहिल्यांदाच धुळ्यातून उज्जैनच्या महाकाल मंदिराकडे पदयात्रा निघाल्याने परिसरातील शेकडो भोलेभक्तांनी या यात्रेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ट्रॅक्टरवर आकर्षक पद्धतीने सजविण्यात आलेली भगवान महादेवाची पिंड पदयात्रेचे विशेष आकर्षण ठरली. सायंकाळच्या सुमारास चितोड रोड परिसरातून पदयात्रेला सुरुवात झाली. महिला भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग पदयात्रेदरम्यान भोले बाबांच्या भक्तिगीतांवर महिला भाविकांनी उत्स्फूर्तपणे नृत्य केले. महापौरांसह नगरसेविका आणि परिसरातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने पदयात्रेला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले होते. मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांकडून पदयात्रेचे स्वागत करण्यात आले. दहा दिवसांच्या या आध्यात्मिक प्रवासानंतर भाविक उज्जैन येथे पोहोचून महाकालाचे दर्शन घेणार असल्याची माहिती भोलेनाथ हनुमान मंदिर समितीचे विनोद जगताप यांनी दिली. मान्यवरांची उपस्थिती यावेळी भोलेनाथ हनुमान मंदिर समितीचे विनोद जगताप, मायादेवी परदेशी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते सुधाकर बेंद्रे, नगरसेवक अमोल मासुळे, युवराज चौधरी, नगरसेविका चित्रलेखा परदेशी, गीता नवले, तसेच महादेव परदेशी, भैय्या शिंदे, चेतन मंडोरे, किशोर सरगर, प्रफुल माने यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.